नागरी जमीन कमाल धारणा अधिनियम १९७६,

अधिनियमाच्या कलम २० खाली औद्योगिक विभागात समाविष्ट असणाऱ्या जमिनींना औद्योगिक वापरासाठी कलम २० खाली सुट देण्याबाबत दि. ५.४.१९७९ रोजी घोषित केलेले धोरण.

महाराष्ट्र शासन,
गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक:नाजक १०९६/[६४८६]/नाजकधा-१,
मंत्रालय, मुंबई: ४०० ०३२,
दिनांक : १० एप्रिल, १९९७,

वाचा :- शासनाचे विधानसभेत दि. ५.४.१९७९ रोजी नागरी जमीन कमाल धारणा अंतर्गत कलम २० खाली सुट देण्याबाबत घोषित केलेले औद्योगिक धोरण.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्यातील मुंबई पुणे,ठाणे,उल्हासनगर,सांगली,कोल्हापूर, सोलापूर,नाशिक आणि नागपूर या ९ नागरी समुहाच्या हद्दीत औद्योगिक विभागात समाविष्ट होणाऱ्या अतिरिक्त मोकळया जमिनींना औद्योगिक वापरासाठी कलम २० खाली सुट देण्याचे धोरण शासनाने दि. ५.४.१९७९ रोजी घोषित केले होते. सदर धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, व्यवस्थापकीय संचालक, पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ आणि विदर्भ विकास महामंडळ यांच्या प्रक्षेत्रामध्ये समाविष्ट होणाऱ्या औद्योगिक जमिनींना कलम २० खाली सुट देण्याचे अधिकार संबंधितांना प्रदान केले होते. ९ नागरी समुहातील उर्वरित औद्योगिक वापरासाठी कलम २० खाली सुट देण्याचे अधिकार विकास आयुक्त [उद्योग], उद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. कलम २० खाली दिलेल्या सुटीच्या आदेशानुसार एखाद्या औद्योगिक घटकाने अतिरिक्त मोकळया जमिनींवर स्थानिक प्राधिकरणाचा परवाना घेऊन रितसर बांधकाम केले असेल आणि अशा बांधकामांना व्यापलेल्या जमिनी हस्तांतर करावयाच्या असतील तर याबाबत शासनाचे धोरण काय असावे हा प्रस्ताव विचाराधीन होता. शासनाने विचाराअंती पुढे दर्शविल्याप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

[कृ. मा. प.]

निर्णय :-

[१] नागरी जमीन कमाल धारणा अधिनियमाच्या कलम २० खाली औद्योगिक वापरासाठी सुट दिलेल्या जमिनी शासनाच्या पूर्व परवानगी-शिवाय हस्तांतरीत करता येणार नाहीत. सुट दिलेल्या जमिनी मोकळ्या स्वरूपात असतील तर मुंबई आणि पुणे नागरी समुहात प्रचलित बाजारभावाने होणाऱ्या जमिनीच्या २५% रक्कम आणि इतर नागरी समुहात प्रचलित बाजारभावाने होणाऱ्या किंमतीच्या १५% रक्कम हस्तांतरण शुल्क म्हणून आकारून अतिरिक्त मोकळ्या जमिनीस हस्तांतरणासाठी परवानगी देण्यात यावी.

[२] नागरी जमीन कमाल धारणा अधिनियमाच्या कलम २० खाली दिलेल्या सुटीच्या आदेशातील अटी व शर्तीनुसार बांधकाम पूर्ण केलेले असेल आणि बांधकाम करणारे मुळ औद्योगिक घटक बंद असेल व सुटीच्या आदेशानुसार बांधकाम पूर्ण होऊन १० वर्षांचा कालावधी लोटला असेल तर अशा प्रकरणांमध्ये बांधकामांनी व्यापलेल्या जमिनी विना शुल्क हस्तांतरण करण्यास परवानगी देण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ जयंत देशपांडे ]
सचिव,

वरील आदेशाची प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित :-

[१] राज्यपालांचे सचिव,
[२] मुख्यमंत्र्यांचे प्रधान, सचिव,
[३] उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
[४] मंत्री [नागरी जमीन कमाल धारणा] यांचे खाजगी सचिव,
[५] सर्व मंत्र्यांचे खाजगी सचिव,
[६] राज्यमंत्री [नाजकधा] यांचे खाजगी सचिव,
[७] सर्व राज्यमंत्र्यांचे खाजगी सचिव,
[८] मुख्य सचिव,



Scanned with CamScanner